पुढारी

# आधुनिक हवामान संशोधनाला मिळणार बळ!

## शिवाजी विद्यापीठाचा आयआयटीएमसमवेत सामंजस्य करार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

केंद्रीय पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेट्रॉलॉजी (आयआयटीएम) या आघाडीच्या संस्थेसमवेत शिवाजी विद्यापीठाने सामंजस्य करार केला आहे. या करारामुळे हवामानविषयक आधुनिक संशोधनाच्या अनुषंगाने दोन्ही संस्थांमध्ये आदान-प्रदान होणार आहे.

आयआयटीएम देशातील प्रमुख वैज्ञानिक संशोधन संस्था आहे. ही संस्था हवामान आणि हवामान अंदाज सुधारण्यासाठी आवश्यक असलेल्या महासागरीय वातावरण प्रणालीच्या विविध पैलूंच्या अनुषंगाने संशोधनकार्य करत आहे. संस्था भारत सरकारच्या पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत आहे. विद्यापीठात नुकताच कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत सामंजस्य करार झाला.



कोल्हापूर : केंद्रीय पृथ्वी मंत्रालयाच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेट्रॉलॉजी संस्थेसमवेत शिवाजी विद्यापीठाचा सामंजस्य करार झाला. याप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. डॉ. एस. डी. पवार, डॉ. एम. एन. पाटील, डॉ. टी. धर्मराज, डॉ. सचिन पन्हाळकर आदी. (छाया : पप्पू अत्तार)

सामंजस्य करारावर आयआयटीएमचे संचालक डॉ. आर. कृष्णन, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी स्वाक्षरी केल्या. या प्रसंगी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, हवामान बदल व शाश्वतता अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. सचिन पन्हाळकर उपस्थित होते. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेट्रॉलॉजी यांच्या वतीने डॉ. एस. डी. पवार, डॉ. एम. एन. पाटील, डॉ. टी. धर्मराज, भारती विद्यापीठाच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. दादा पी. नाडे, डॉ. सोमनाथ पवार, डॉ. राजीव व्हटकर, डॉ. तुकाराम डोंगळे, डॉ. राणी पवार, डॉ. अभिजित पाटील व सुधीर पोवार उपस्थित होते.

सकाळ

# हवामानविषयक संशोधन होणार

## शिवाजी विद्यापीठ-'आयआयटीएम'मध्ये सामंजस्य करार



कोल्हापूर : सामंजस्य करारप्रसंगी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासमवेत डॉ. एस. डी. पवार, डॉ. एम. एन. पाटील, डॉ. टी. धर्मराज, डॉ. सचिन पन्हाळकर आदी.

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठाने केंद्रीय पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेट्रॉलॉजी (आय.आय.टी.एम.) या संस्थेसमवेत सामंजस्य करार केला. या करारामुळे हवामानविषयक आधुनिक संशोधनाच्या अनुषंगाने दोन्ही संस्थांमध्ये आदानप्रदान होणार आहे.

आयआयटीएम ही देशातील एक प्रमुख वैज्ञानिक संशोधन संस्था आहे. ही संस्था हवामान आणि हवामान अंदाज सुधारण्यासाठी आवश्यक असलेल्या महासागरीय वातावरण प्रणालीच्या विविध पैलूंच्या अनुषंगाने संशोधनकार्य करत आहे. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. या कराराच्या माध्यमातून विद्यापीठ परिसरात आणि पन्हाळा येथील विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्र परिसरात वेदर स्टेशन बसवण्यात येणार आहेत. पुढे टप्प्याटप्प्याने या स्टेशनची संख्या वाढविण्यात येईल. याचा लाभ वातावरणातील तापमान, पर्जन्य, आर्द्रता अशा विविध घटकांचे मोजमाप करण्यासाठी होणार आहे. या करारावर आयआयटीएमचे संचालक डॉ. आर. कृष्णन आणि शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी स्वाक्षरी केल्या.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, हवामान बदल व शाश्वतता अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. सचिन पन्हाळकर, 'आयआयटीएम'चे शास्त्रज्ञ डॉ. एस. डी. पवार, एम. एन. पाटील, डॉ. टी. धर्मराज, दादा नाडे, सोमनाथ पवार, राजीव व्हटकर, तुकाराम डोंगळे, राणी पवार, अभिजित पाटील, सुधीर पोवार उपस्थित होते.

> शिवाजी विद्यापीठाने हवामान बदलाबाबत निर्धारित केलेली शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करण्याच्या दृष्टीने हा करार अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.
> **- डॉ. दिगंबर शिंदे**, कुलगुरू

### कराराचा विविध अधिविभागांना लाभ

या कराराचा लाभ विद्यापीठातील सेंटर फॉर क्लायमेट चेंज अँड सस्टॅनॅबिलिटी स्टडीज, भूगोल, संख्याशास्त्र, गणित, पर्यावरणशास्त्र अधिविभागांसह संगणक विभागासही होईल.

22 JUL 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या आधुनिक हवामान संशोधनाला मिळणार बळ

## इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेट्रॉलॉजीसमवेत सामंजस्य करार

कोल्हापूर : प्रतिनिधी

केंद्रीय पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेट्रॉलॉजी (आयआयटीएम) या आघाडीच्या संस्थेसमवेत शिवाजी विद्यापीठाने सामंजस्य करार केला आहे. शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत हा करार करण्यात आला. या कराराचा मुख्य उद्देश दोन्ही संस्थांमध्ये सहयोगी संघटन स्थापन करणे हा आहे. याचा दोन्ही संस्थांमधील पुढील संशोधन कार्यासाठी परस्पर फायदा होणार आहे. या करारामुळे हवामानविषयक आधुनिक संशोधनाच्या अनुषंगाने दोन्ही संस्थांमध्ये आदान-प्रदान होणार आहे.

आयआयटीएम ही देशातील एक प्रमुख वैज्ञानिक संशोधन संस्था आहे. ही संस्था हवामान आणि हवामान अंदाज सुधारण्यासाठी आवश्यक असलेल्या महासागरीय वातावरण प्रणालीच्या विविध पैलूंच्या अनुषंगाने भारत सरकारच्या पृथ्वी विज्ञान मंत्रालयांतर्गत कार्यरत आहे.

या कराराच्या माध्यमातून विद्यापीठ परिसरात आणि पन्हाळा येथील विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्र परिसरात वेदर स्टेशन वसवण्यात येणार आहे. पुढे टप्प्याटप्प्याने या स्टेशनची संख्या वाढवण्यात येईल. याचा लाभ वातावरणातील तापमान, पर्जन्य, आर्द्रता अशा विविध घटकांचे मोजमाप करण्यासाठी होणार आहे. आजकाल ग्लोबल वॉर्मिंग, हवामानातील बदल यामुळे महापूर, दुष्काळ, दरडी कोसळणे आदी अनेक नैसर्गिक संकटे येताना दिसतात. या कराराच्या माध्यमातून अशा विविध बाबींविषयी दोन्ही संस्थांमध्ये संशोधन केले जाईल आणि आवश्यक त्या माहितीचे आदान-प्रदानही केले जाईल. या कराराचा लाभ विद्यापीठातील सेंटर फॉर क्लायमेट चेंज अँड सस्टेनॅबिलिटी स्टडीज, भूगोल, संख्याशास्त्र, गणित, पर्यावरणशास्त्र अधिविभागांसह संगणक विभागासही होईल. याखेरीज दोन्ही संस्थांमधील संशोधक, विद्यार्थी हे आदान-प्रदान पद्धतीने दोन्ही संस्थांमध्ये संशोधन करू शकतील.

सामंजस्य करारावर आयआयटीएमचे संचालक डॉ. आर. कृष्णन आणि शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी स्वाक्षरी केल्या. याप्रसंगी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, तसेच हवामान बदल व शाश्वतता अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. सचिन पन्हाळकर उपस्थित होते. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेट्रॉलॉजी यांच्या वतीने शास्त्रज्ञ (जी) डॉ. एस. डी. पवार, शास्त्रज्ञ (एफ) डॉ. एम. एन. पाटील आणि डॉ. टी. धर्मराज, भारती विद्यापीठाच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. दादा पी. नाडे, डॉ. सोमनाथ पवार, डॉ. राजीव व्हटकर, डॉ. तुकाराम डोंगळे, डॉ. राणी पवार, डॉ. अभिजित पाटील व सुधीर पोवार उपस्थित होते.

> शिवाजी विद्यापीठाने हवामान बदल व शाश्वतता अभ्यास केंद्राची स्थापना करून हवामान बदलाच्या अनुषंगाने संशोधनावर गांभीर्यपूर्वक लक्ष केंद्रित केले आहे. विद्यापीठाने हवामान बदलाबाबत निर्धारित केलेली शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करण्याच्या दृष्टीने सदरचा करार अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. दोन्ही संस्थांमध्ये संशोधन व आदान-प्रदान सहकार्य वृद्धिंगत होऊन उपयुक्त संशोधनाला बळ देणारा ठरेल.
>
> -डॉ. दिगंबर शिर्के, कुलगुरू

22 JUL 2023 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रशांत श्रृंगारे, रजत खोपडे यांचा शिवाजी विद्यापीठातर्फे गौरव

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ क्रिकेट संघातून आंतरविद्यापीठ क्रिकेट स्पर्धेत प्रतिनिधित्व केलेले माजी क्रिकेटपटू प्रशांत श्रृंगारे व रजत खोपडे या दोघांनीही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परिक्षेत कौतुकास्पद यश मिळवले आहे. या यशातून प्रशांत यांची पोलीस उपनिरीक्षकपदी तर रजत यांची मंत्रालय सहाय्यकपदी नियुक्ती झाली आहे. त्याची दखल घेऊन शिवाजी विद्यापीठाच्या वतीने दोघांचाही प्र–कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते सत्कार केला.

विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी सत्कारमूर्तींनी क्रिकेटसाठी दिलेल्या योगदानाची माहिती दिली. ते म्हणाले, प्रशांत हे २०१३ साली बडोदा येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ क्रिकेट स्पर्धेत तर रजत हे २०१५ साली भोपाळ (मध्यप्रदेश) येथे



कोल्हापूर : माजी क्रिकेटपटू प्रशांत श्रृंगारे, रजत खोपडे यांचा गौरव करताना मान्यवर.

- **एमपीएससी परीक्षेत यश संपादन केल्याबद्दल सन्मान**

झालेल्या आंतरविद्यापीठ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघातून खेळले होते. त्यांनी सुरेख फलंदाजी व गोलदांजी करुन विद्यापीठाच्या संघाला सामने जिंकून देण्यात मोलाचा वाटा उचलला होता.

प्र–कुलगुरु डॉ. पाटील म्हणाले, खेळाडू म्हणून क्रिकेटमध्ये कारकीर्द घडवत असतानाच प्रशांत व रजत यांनी स्पर्धा परीक्षेचा मनापासून अभ्यास केला. परिक्षेत यश मिळवून मोठ्या पदांपर्यंत झेप घेतली. त्यांची ही कामगिरी इतर विद्यार्थ्यांसाठी नक्कीच आदर्शवत आहे. प्रशांत व रजत यांनी अधिकारी म्हणून काम करतानाच क्रीडा क्षेत्राकडे अजिबात दुर्लक्ष करु नये, असेही डॉ. पाटील यांनी सांगितले. यावेळी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे, प्रा. सुचय खोपडे उपस्थित होते.

लोकमत

# विद्यापीठाच्या माजी क्रिकेटपटूंचे स्पर्धा परीक्षेत यश

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये शिवाजी विद्यापीठाचे माजी क्रिकेटपटू प्रशांत शृंगारे आणि रजत खोपडे यांनी यश संपादन केल्याबद्दल विद्यापीठातर्फे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला.

प्रशांत शृंगारे यांची पीएसआयपदी, तर रजत खोपडे यांची मंत्रालय सहायकपदी निवड झाली. या दोघाही खेळाडूंनी २०१३ ते २०१५ साली शिवाजी विद्यापीठाचे आंतरविद्यापीठ क्रिकेट स्पर्धेत प्रतिनिधित्व केले आहे. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे, प्रा. सुचय खोपडे उपस्थित होते.

या दोन्ही खेळाडूंचे यश शिवाजी विद्यापीठासाठी भूषणावह असल्याचे डॉ. प्रमोद पाटील यांनी सांगितले. तसेच शृंगारे व खोपडे यांनी आणखी यश मिळवावे, यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या.

22 JUL 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## सहा वर्षांचा दंडक शिवाजी विद्यापीठाकडून रद्द

# पदवीसाठी आता वर्षांचे बंधन नाही

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २१ : राज्यात नवे शैक्षणिक धोरण राबविण्यात शिवाजी विद्यापीठाने आघाडी घेतली आहे. यापूर्वीच्या विद्यापीठ कायद्यांनुसार अस्तित्वात आलेल्या ज्या दंडकांमुळे विद्यार्थ्यांवर पदवी अभ्यासक्रम सहा वर्षांमध्ये पूर्ण करण्याचे बंधन होते, ते दंडक (ऑर्डिनन्स) क्रमांक ७९ आणि ८० (अ) आता रद्द करण्यात आले आहेत.

नव्या शैक्षणिक धोरणामध्ये विद्यार्थ्यांचे कोणत्याही स्तरावरील शिक्षण खंडित होऊ नये, तसेच काही कारणांनी शिक्षणापासून दुरावल्यास पुन्हा उर्वरित शिक्षण पूर्ण करण्याची तरतूद करण्यात आली आहे. विद्यापीठाच्या पूर्वीच्या कायद्यानुसार अस्तित्वात आलेले दंडक ७९ व ८० (अ) हे या धोरणातील तरतुदीला छेद देणारे ठरत असल्याने ते रद्द करण्याची शिफारस विद्यापीठाने कुलपती कार्यालयास केली होती. ती शिफारस मान्य करण्यात आली असल्याची माहिती प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आज दिली.

### अॅकॅडेमिक क्रेडिटस् घेता येणार

■ 'या दोन्ही दंडकांमध्ये असणारी तरतूद राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने बदलणे आवश्यक असल्याने विद्यापीठाकडून हे दंडक रद्द करण्याबाबतची कार्यवाही आता पूर्ण झाली आहे. आता विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अॅकॅडेमिक क्रेडिटस् घेता येतील आणि ते अॅकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिटमध्ये एकत्रित जमाही करता येतील', असे डॉ. शिंदे यांनी सांगितले.

पूर्वी दंडक ७९ नुसार पदवी स्तरावरील विद्यार्थी कोणत्याही एका वर्षातील परीक्षेत एखाद्या विषयात अनुत्तीर्ण झाला असल्यास त्या वर्षात असणारे सर्व विषय त्या परीक्षेच्या सत्रापासून सहा वर्षांत उत्तीर्ण होणे आवश्यक होते. विद्यार्थी जर सहा वर्षांत त्या विषयांत उत्तीर्ण होऊ शकला नाही, तर सहा वर्षांपूर्वी ज्या विषयात उत्तीर्ण झाला असेल, त्या संपूर्ण वर्षामध्ये असणाऱ्या विषयांची परीक्षा त्याला पुन्हा संबंधित वर्गात नव्याने प्रवेश घेऊन द्यावी लागत असे. ही अट आता रद्द करण्यात आली आहे. दंडक ८० (अ) नुसार बी.ए./ बी.कॉम./ बी.एस्सी या पदवी अभ्यासक्रमातील नियमित अथवा दूरस्थ विद्यार्थ्यांस त्याच्या प्रथम परीक्षेपासून सहा वर्षांत संबंधित अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक होते. तथापि, जर विद्यार्थी निर्धारित वेळेत अभ्यासक्रम पूर्ण करू शकला नाही, तर त्याची भाग १, २ व ३ मधील परीक्षेची संपूर्ण संपादणूक रद्द होत असे आणि त्याला पुनश्च परीक्षा द्याव्या लागत असत. हा दंडकही आता रद्द करण्यात आला असल्याचे डॉ. शिंदे यांनी सांगितले.

# पदवी अभ्यासक्रम सहा वर्षांत पूर्ण करण्याचे बंधन झाले दूर

## शिवाजी विद्यापीठाकडून दंडक ७९ आणि ८० (अ) रद्द

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पदवी अभ्यासक्रम सहा वर्षांत पूर्ण करण्याचे बंधन असणारा (ऑर्डिनन्स) क्रमांक ७९ आणि ८० (अ) हा दंडक रद्द करण्यात आला आहे. यामुळे हे बंधन दूर झाल्याची माहिती शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी शुक्रवारी दिली.

नव्या शैक्षणिक धोरणामध्ये विद्यार्थ्यांचे कोणत्याही स्तरावरील शिक्षण खंडित होऊ नये, तसेच काही कारणांनी शिक्षणापासून दुरावल्यास पुन्हा उर्वरित शिक्षण पूर्ण करण्याची तरतूद केली आहे. पूर्वीच्या कायद्यानुसार अस्तित्वात आलेले दंडक ७९ व ८० (अ) हे या धोरणातील तरतुदीला छेद देणारे ठरत असल्याने ते रद्द करण्याची शिफारस विद्यापीठाने कुलपती कार्यालयास केली होती. ती शिफारस मान्य करण्यात आली आहे. पूर्वी दंडक ७९ नुसार पदवी स्तरावरील विद्यार्थी कोणत्याही एका वर्षातील परीक्षेत एखाद्या विषयात अनुत्तीर्ण झाला असल्यास त्या वर्षात असणारे सर्व विषय त्या परीक्षेच्या सत्रापासून सहा वर्षांत उत्तीर्ण होणे आवश्यक होते. जर सहा वर्षांत त्या विषयांत उत्तीर्ण होऊ शकला नाही, तर सहा वर्षांपूर्वी ज्या विषयात उत्तीर्ण झाला असेल, त्या संपूर्ण वर्षामध्ये असणाऱ्या विषयांची परीक्षा त्याला पुन्हा संबंधित वर्गात नव्याने प्रवेश घेऊन द्यावी लागत असे. ही अट आता रद्द केली. तसेच दंडक ८० (अ) नुसार बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. या पदवी अभ्यासक्रमातील नियमित अथवा दूरस्थ विद्यार्थ्यास त्याच्या प्रथम परीक्षेपासून सहा वर्षांत संबंधित अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक होते. जर विद्यार्थी निर्धारित वेळेत अभ्यासक्रम पूर्ण करू शकला नाही, तर त्याची भाग १, २ व ३ मधील परीक्षेची संपूर्ण संपादणूक रद्द होऊन त्याला पुनश्च परीक्षा द्याव्या लागत होत्या. हा दंडकही रद्द केला आहे.



जे विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहातून मध्येच बाहेर पडत होते त्यांना सात वर्षांपर्यंत कधीही पदवीची डिग्री घेता येईल. हा निर्णय विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त आहे.

- डॉ. व्ही. एम. पाटील,
प्राचार्य-न्यू कॉलेज, कोल्हापूर.

### मल्टिपल एन्ट्री, अन एक्झिट

नव्या शैक्षणिक धोरणानुसार मल्टिपल एंट्री, मल्टिपल एक्झिटचा नवा पर्याय देण्यात आला आहे. यात विद्यार्थ्यांना पदवीचे शिक्षण अर्धवट सोडले तरी सात वर्षांपर्यंत ते पूर्ण करता येणार आहे. पूर्वी ही अट सहा वर्षांपर्यंत होती. पदवीचे प्रथम वर्ष पूर्ण केलेल्या विद्यार्थ्याला काही कारणास्तव पुढील शिक्षण घेता येत नसेल तर तो विद्यार्थी मध्येच शिक्षण सोडू शकतो. सात वर्षांपर्यंत तो पदवीचे शिक्षण पूर्ण करू शकतो. यासाठी त्याला प्रत्येक टप्प्यावर क्रेडिट गुण मिळवावे लागतील, शिवाय एका विद्यापीठातून तो दुसऱ्या विद्यापीठातही उर्वरित शिक्षण पूर्ण करू शकेल.

पुढारी

# पदवी अभ्यासक्रम सहा वर्षांत पूर्ण करण्याचे बंधन आता दूर!

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राज्यात नवीन शैक्षणिक धोरण राबविण्यात आघाडी घेत असतानाच त्याच्याशी सुसंगत असे निर्णय घेण्यात शिवाजी विद्यापीठ पुढे सरसावले आहे. पदवी अभ्यासक्रम सहा वर्षांत पूर्ण करण्याचे बंधन होते ते दंडक (ऑर्डिनन्स) क्र. ७९, ८० (अ) आता रद्द करण्यात आले आहेत. आता विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अ‍ॅकॅडेमिक क्रेडिटस् घेता येतील. अ‍ॅकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिटमध्ये एकत्रित जमा करता येतील.

नव्या शैक्षणिक धोरणामध्ये विद्यार्थ्यांचे कोणत्याही स्तरावरील शिक्षण खंडित होऊ नये, काही कारणांनी शिक्षणापासून वंचित राहिल्यास पुन्हा उर्वरित शिक्षण पूर्ण करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

विद्यापीठाच्या पूर्वीच्या कायद्यानुसार अस्तित्वात आलेले दंडक ७९ व ८० (अ) हे या धोरणातील तरतुदीला छेद देणारे ठरत असल्याने ते रद्द करण्याची शिफारस विद्यापीठाने कुलपती कार्यालयास केली होती. ती शिफारस मान्य करण्यात आली आहे.

- **शिवाजी विद्यापीठाकडून दंडक ७९, ८० (अ) रद्द**
- **नव्या शैक्षणिक धोरणाशी सुसंगत निर्णय**

पूर्वी दंडक ७९ नुसार पदवी स्तरावरील विद्यार्थी कोणत्याही एका वर्षातील परीक्षेत एखाद्या विषयात अनुत्तीर्ण झाला असल्यास त्या वर्षात असणारे सर्व विषय त्या परीक्षेच्या सत्रापासून सहा वर्षांत उत्तीर्ण होणे आवश्यक होते. विद्यार्थी जर सहा वर्षांत त्या विषयात उत्तीर्ण होऊ शकला नाही तर सहा वर्षांपूर्वी ज्या विषयात उत्तीर्ण झाला असेल, त्या संपूर्ण वर्षामध्ये असणाऱ्या विषयांची परीक्षा त्याला पुन्हा संबंधित वर्गात नव्याने प्रवेश घेऊन द्यावी लागत असे. ही अट आता रद्द करण्यात आली आहे.

# पदवी अभ्यासक्रम ६ वर्षांत पूर्ण करण्याचे बंधन दूर

## शिवाजी विद्यापीठाकडून दंडक ७९ आणि ८० (अ) रद्द; नव्या शैक्षणिक धोरणाशी सुसंगत निर्णय

कोल्हापूर : प्रतिनिधी

राज्यामध्ये नवे शैक्षणिक धोरण राबविण्यामध्ये आघाडी घेत असतानाच त्याच्याशी सुसंगत असे निर्णय घेण्याच्या बाबतीतही येथील शिवाजी विद्यापीठ पुढे सरसावले आहे. यापूर्वीच्या विद्यापीठ कायद्यानुसार अस्तित्वात आलेल्या ज्या दंडकांमुळे विद्यार्थ्यांवर पदवी अभ्यासक्रम सहा वर्षांत पूर्ण करण्याचे बंधन होते. ते दंडक क्र. ७९ आणि ८० (अ) आता रद्द करण्यात आले आहेत, अशी माहिती विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी दिली.

डॉ. शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, नव्या शैक्षणिक धोरणामध्ये विद्यार्थ्यांचे कोणत्याही स्तरावरील शिक्षण खंडित होऊ नये, तसेच काही कारणांनी शिक्षणापासून दुरावल्यास पुन्हा उर्वरित शिक्षण पूर्ण करण्याची तरतूद करण्यात आली आहे. विद्यापीठाच्या पूर्वीच्या कायद्यानुसार अस्तित्वात आलेले दंडक ७९ व ८० (अ) हे या धोरणातील तरतुदीला छेद देणारे ठरत असल्याने ते रद्द करण्याची शिफारस विद्यापीठाने कुलपती कार्यालयास केली होती. ती शिफारस मान्य करण्यात आली आहे.

असा झाला बदल...

पूर्वी दंडक ७९ नुसार पदवी स्तरावरील विद्यार्थी कोणत्याही एका वर्षातील परीक्षेत एखाद्या विषयात अनुत्तीर्ण झाला असल्यास त्या वर्षात असणारे सर्व विषय त्या परीक्षेच्या सत्रापासून सहा वर्षांत उत्तीर्ण होणे आवश्यक होते. विद्यार्थी जर सहा वर्षांत त्या विषयांत उत्तीर्ण होऊ शकला नाही, तर सहा वर्षांपूर्वी ज्या विषयात उत्तीर्ण झाला असेल, त्या संपूर्ण वर्षामध्ये असणाऱ्या विषयांची परीक्षा त्याला पुन्हा संबंधित वर्गात नव्याने प्रवेश घेऊन द्यावी लागत असे. ही अट आता रद्द करण्यात आली आहे. तसेच दंडक ८० (अ) नुसार बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. या पदवी अभ्यासक्रमातील नियमित अथवा दूरस्थ विद्यार्थ्यास त्याच्या प्रथम परीक्षेपासून सहा वर्षांत संबंधित अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक होते. जर विद्यार्थी निर्धारित वेळेत अभ्यासक्रम पूर्ण करू शकला नाही, तर त्याची भाग १, २ व ३ मधील परीक्षेची संपूर्ण संपादणूक रद्द होत असे आणि त्याला पुनश्च परीक्षा द्याव्या लागत असत. हा दंडकही आता रद्द करण्यात आला आहे.

या दोन्ही दंडकांमध्ये असणारी तरतूद राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने बदलणे आवश्यक असल्याने विद्यापीठाकडून हे दंडक रद्द करण्याबाबतची कार्यवाही आता पूर्ण झालेली आहे. आता विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार ॲकॅडेमिक क्रेडिटस् घेता येतील आणि ते ॲकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिटमध्ये एकत्रित जमाही करता येतील.

तरुण भारत

# सहा वर्षात अभ्यासक्रम पूर्ण करण्याची अट रद्द

कोल्हापूर : पूर्वीच्या विद्यापीठ कायद्यांनुसार अस्तित्वात आलेल्या दंडकांमुळे विद्यार्थ्यांवर पदवी अभ्यासक्रम सहा वर्षांत पूर्ण करण्याचे बंधन होते. ते दंडक क्रमांक ७९ आणि ८० (अ) आता रद्द करण्यात आले असल्याची माहिती विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी दिली. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण खंडित होणार नाही. शिक्षणापासून दुरावल्यास उर्वरित शिक्षण पूर्ण करण्याची तरतूद करण्यात आली असल्याचे सांगितले. डॉ. शिंदे म्हणाले, पुर्वीच्या कायद्यानुसार बी.ए., बी. कॉम, बी.एस्सी. पदवी अभ्यासक्रमातील प्रथम परीक्षेपासून सहा वर्षांत संबंधित अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक होते.

पुढारी

# विद्यापीठ परीक्षेला १३५३ विद्यार्थी उपस्थित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. शुक्रवारी मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, बॅचलर फार्मसी, मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन या अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालयामध्ये झाल्या. परीक्षेसाठी १३५३ विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, शुक्रवारी बॅचलर ऑफ आर्किटेक्चर, फिजिक्स, बायो केमेस्ट्री, मॅथेमॅटिक्स, मायक्रोबायोलॉजी, एम.कॉम., एम.ए.(इतिहास), एम.ए.(मास कम्युनिकेशन), बी.ए.बीएड.आदी २५ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले. आजअखेर ५५८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. भरारी पथकाकडून सातारा जिल्ह्यातून ७ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आली.